# मुंबई पोर्ट ट्रस्ट कर्मचारी (सेवाप्रवेश, सेवाज्येष्ठता व पदोन्नती) विनियम, २०१०

## (सेवाप्रवेश, सेवाज्येष्ठता व पदोन्नती)विनियम, २०१०.

## निर्देशसूची


| विनियम | अनुक्रमणिका | पृष्ठ |
|---|---|---|
| १. | संक्षिप्त नाव व प्रारंभ | |
| २. | प्रयुक्ती | |
| ३. | व्याख्या | |
| ४. | नियुक्तीची पध्दत | |
| ५. | अनुसूची | |
| ६. | रिक्त पदांची नामावली | |
| ७. | आरक्षण | |
| ८. | सरळ सेवाप्रवेशासाठी, राष्ट्रीयत्व. चारित्र्य. शारीरिक पात्रता इत्यादी | |
| ९. | सरळ सेवाप्रवेशासाठी सध्या कार्यरत कर्मचा-याची पात्रता | |
| १०. | रिक्त पदांची जाहिरात | |
| ११. | विशिष्ट बाबतीत लेखी किंवा कौशल्य चाचण्यांचे आयोजन | |
| १२. | सेवा निवड समिती | |
| १३. | निवड सूची | |
| १४. | सेवा निवड समितीच्या शिफारशी विचारात घेणे आणि तदर्थ नेमणुका करणे. | |
| १५. | वशिलेबाजी ही अपात्रता असणे | |
| १६. | सत्य लपवणे ही अपात्रता असणे | |

| | | |
|---|---|---|
| १७. | नियुक्ती आदेश रद्द करणे | |
| १८. | मुलाखतीस उपस्थित राहण्याकरीता प्रवासभत्ता देणे | |
| १९. | परिविक्षाधीन कालावधी | |
| २०. | परिविक्षाधीन कर्मचा-यास कायम करणे | |
| २१. | पदोन्नत कर्मचा-यास कार्यमुक्त किंवा प्रत्यावर्तन करणे | |
| २२. | विवक्षित बाबतीत, पदोन्नती, कायम करणे या करीता विभागीय चाचणी. | |
| २३. | विभागीय चाचणीत अयशस्वी ठरल्यास प्रत्यावर्तन | |
| २४. | सेवाज्येष्ठता यादी | |
| २५. | सेवाज्येष्ठतेची निश्चिती | |
| २६. | विभागीय पदोन्नती समिती | |
| २७. | पदोन्नतीसाठीचे निवड क्षेत्र | |
| २८. | तदर्थ नेमणुका | |
| २९. | अनुकंपा तत्वावरील नियुक्त्या | |
| ३०. | उकल | |
| ३१. | निरसन व व्यावृत्ती | |
| | अनुसूची | |

# <u>अनुसूची - एक</u>

**निर्देशिका** **विनियम ५ पहा**


| अ.क्र. | विभाग | विनियमांतील अ.क्र | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| १. | मनुष्यबळ विकास विभाग | १–७ | |
| २. | सामान्य प्रशासन विभाग | | |
| | *प्रशासकीय अधिकारी (सामान्य संकोष) | ८–९ | |
| | *उपाध्यक्षांचे स्वीय सचिव/अध्यक्षांचे स्वीय सचिव | १०–१२ | |
| | कल्याण प्रभाग | १३–२० | |
| | सुरक्षा प्रभाग | २१–२३ | |
| | स्थावर प्रभाग | २४–२७ | |
| | विधि प्रभाग | २८–३१ | |
| | *नियोजन व संशोधन प्रभाग (संशोधन शाखा) | ३२–३५ | |
| | *नियोजन व संशोधन प्रभाग (इडीपी शाखा) | ३६–३८ | |
| | *दूरसंचरण व इलेक्ट्रॉनिक्स शाखा | ३९–४२ | |
| ३. | वित्त विभाग | ४३–४७ | |
| ४. | यंत्र अभियांत्रिकी विभाग | ४८–५२ | |
| | साहित्य व्यवस्थापन प्रभाग | ५३–५७ | |
| ५. | वाहतूक विभाग | ५८–६४ | |
| | रेल्वे प्रभाग | ६५–६८ | |
| ६. | स्थापत्य अभियांत्रिकी विभाग | ६९–७४ | |
| ७. | वैद्यकीय विभाग | ७५–८९ | |
| ८. | सागरी विभाग | ९०–१०३ | |
| ९. | दक्षता विभाग | १०४–१०८ | |
| | शुध्दीपत्रक | | |

**नौवहन मंत्रालय**

**(बंदरे विभाग)**

**अधिसूचना**

**नवी दिल्ली, ७ मे २०१०**

सा. का. नि. ३८७ (अ) मुख्य पोर्ट ट्रस्ट अधिनियम , १९६३ (१९६३ चा ३८) च्या कलम १३२ चे पोट - कलम (१) सह गठित कलम १२४ च्या पोट - कलम (१) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन केंद्र सरकार, या अधिसूचनेसोबत जोडलेल्या अनुसूचीतील यथास्थापित मुंबई बंदर विश्वस्त मंडळाच्या विश्वस्त मंडळाद्वारे तयार केलेले मुंबई पोर्ट ट्रस्ट कर्मचारी (सेवाप्रवेश, सेवाज्येष्ठता व पदोन्नती) विनियम, २०१० यांस याद्वारे मान्यता देत आहे.

२. वरील विनियम, ही अधिसूचना शासकीय राजपत्रात प्रसिध्द होण्याच्या दिनांकापासून अंमलात येतील.

**<u>अनूसूची</u>**

**<u>मुंबई पोर्ट ट्रस्ट</u>**

**<u>मुंबई पोर्ट ट्रस्ट कर्मचारी (सेवाप्रवेश, सेवाज्येष्ठता व पदोन्नती) विनियम, २०१० -</u>**

मुख्य पोर्ट ट्रस्ट अधिनियम, १९६३ (१९६३ चा ३८) चे कलम २८ द्वारा प्राप्त अधिकारांचा वापर करुन, मुंबई पोर्ट ट्रस्ट केंद्र सरकारच्या मान्यतेने वरील अधिनियमाच्या कलम १२४ च्या पोट कलम (१) मध्ये निर्देशित केल्याप्रमाणे, मुंबई पोर्ट ट्रस्ट कर्मचारी (सेवाप्रवेश, सेवाज्येष्ठता व पदोन्नती) विनियम, २०१० या द्वारे तयार करीत आहे.

२. या विनियमांना, मुंबई पोर्ट ट्रस्ट कर्मचारी (सेवाप्रवेश, सेवाज्येष्ठता व पदोन्नती) विनियम, २०१० असे म्हणावे.

३. वरील विनियम, ही अधिसूचना भारताच्या राजपत्रात प्रकाशित झाल्याच्या दिनांकापासून अमंलात येतील.

**<u>मुंबई पोर्ट ट्रस्ट कर्मचारी (सेवाप्रवेश, सेवाज्येष्ठता व पदोन्नती) विनियम, २०१०</u>**

मुख्य पोर्ट ट्रस्ट अधिनियम, १९६३ (१९६३ चा ३८) चे कलम २८ द्वारा प्राप्त अधिकारांचा वापर करुन, मुंबई पोर्ट ट्रस्ट या द्वारे पुढील विनियम तयार करीत आहे.

## १. <u>संक्षिप्त नाव व प्रारंभ</u>

(१) या विनियमांना, मुंबई पोर्ट ट्रस्ट कर्मचारी (सेवाप्रवेश, सेवाज्येष्ठता व पदोन्नती) विनियम, २०१० असे म्हणावे.

(२) ते, मुख्य पोर्ट ट्रस्ट अधिनियम, १९६३ च्या कलम १२४ व १३२ च्या तरतुदींअन्वये आवश्यक असल्याप्रमाणे केंद्र सरकारच्या मान्यतेने भारताच्या राजपत्रात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येतील.

## २. <u>प्रयुक्ती</u>

हे विनियम अधिनियमाच्या कलम २४ च्या पोट-कलम (१) च्या खंड (अ) द्वारे व्याप्त पदांसह अधिनियमाच्या कलम २७ अन्वये मंडळा अंतर्गत निर्माण केलेल्या सर्व पदांना लागू असतील.

## ३. <u>व्याख्या</u>

संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर, या विनियमांत, -

(अ) "अधिनियम" याचा अर्थ, मुख्य पोर्ट ट्रस्ट अधिनियम, १९६३ (१९६३ च्या ३८) असा आहे.

(ब) "समान पद" याचा अर्थ ज्याच्या कर्तव्य व जबाबदारीचा स्तर आणि वेतन श्रेण्या या निवड करावयाच्या पदाशी तुलनात्मक असतील असे पद, असा आहे.

(क) कोणतीही श्रेणी किंवा पद याच्या संबंधात "नियुक्ती प्राधिकारी" याचा अर्थ कोणत्याही श्रेणी किंवा पदावर नियुक्ती करण्यासाठी, मुंबई पोर्ट ट्रस्ट कर्मचारी (वर्गीकरण, नियंत्रण व अपील) विनियम, १९७६ अन्वये अधिकार प्रदान केलेला प्राधिकारी असा आहे.

(ड) "मंडळ", "अध्यक्ष", "उपाध्यक्ष" व "विभाग प्रमुख" याचा अर्थ, अधिनियमात त्यांना अनुक्रमे जो अर्थ नेमून दिला आहे तोच असेल.

(इ) "वर्ग एक ची पदे", "वर्ग दोनची पदे", "वर्ग तीन ची पदे" व "वर्ग चारची पदे" याचा अर्थ, मुंबई पोर्ट ट्रस्ट कर्मचारी (वर्गीकरण, नियंत्रण व अपील) विनियम, १९७६ च्या विनियम ४ मध्ये त्यांना जो अर्थ नेमून दिला आहे तोच असेल.

(फ) "विभागीय पदोन्नती समिती" याचा अर्थ, कोणत्याही श्रेणी किंवा पदावर पदोन्नती किंवा स्थायीकरणाची शिफारस करण्याच्या प्रयोजनार्थ, विनियम २६ अन्वये, वेळोवेळी स्थापित केलेली समिती, असा आहे.

(ग) "सरळ सेवा प्रवेश" याचा अर्थ, सेवा निवड समिती द्वारे स्पर्धात्मक परीक्षा किंवा चाचणी आणि/ किंवा मुलाखत या आधारे भरती केलेली व्यक्ती, असा आहे.

(ह) "कर्मचारी" याचा अर्थ, मंडळाचा कर्मचारी असा आहे.

(आय) "श्रेणी" याचा अर्थ, अधिनियमाच्या कलम २३ अन्वये, मंडळाद्वारे तयार केलेली आणि मान्य केलेली पदांच्या अनुसूचित विनिर्दिष्ट असलेली कोणतीही श्रेणी, असा आहे.

(ज) "धारणाधिकार" याचा अर्थ, त्याला नियमित स्वरुपात नियुक्त करण्यात आलेला असताना आणि तो परिविक्षाधीन कालावधीवर नाही त्या पदावर, एकतर तत्काळ किंवा कालावधीच्या समाप्तीनंतर किंवा अनुपस्थितीच्या कालावधीत, एकाद्या कर्मचा-याने नियमित स्वरुपात धारण केलेला हक्क, असा आहे.

परंतु, नियमित पद धारण करण्याचा हक्क हा, जर असा अधिकार धारण करणा-या व्यक्तींची संख्या ही त्या श्रेणीत उपलबध असलेल्या पदांपेक्षा अधिक असेल तर सर्वात कनिष्ठ कर्मचारी निम्न श्रेणीतील पदावर प्रत्यावर्तित होण्यास पात्र असण्याच्या अटीच्या अधीन असेल.

(के) "स्थायी कर्मचारी" याचा अर्थ, स्थायी पदावर कायम स्वरुपात नियुक्त करण्यात आलेला कर्मचारी, असा आहे.

(ल) "अनुसूची" याचा अर्थ, या विनियमांसोबत जोडलेली अनुसूची असा आहे.

(म) "अनुसूचित जाती" व "अनुसूचित जमाती" याचा अर्थ, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३६६ च्या खंड (२४) व (२५) मध्ये त्यांना जो अर्थ नेमून दिला आहे तोच असेल.

(न) कोणत्याही श्रेणी किंवा पदाच्या संबंधात "निवड सूची" याचा अर्थ, त्या श्रेणी किंवा पदाकरिता विनियम १३ अनुसार तयार केलेली निवडसूची, असा आहे.

(ओ) "निवड पद" या विनियमातील विनियम ५ अन्वये घेषित केलेले असे पद, असा आहे.

(प) "सेवा निवड समिती" याचा अर्थ सरळ सेवाप्रवेशाकरीता राखीव असलेल्या पदावर नियुक्तीसाठी, लेखी चाचणी, कल चाचणी आणि/किंवा मुलाखत या

माध्यमातून उमेदवारांची निवड करण्याकरिता विनियम १२ अन्वये स्थापित समिती, असा आहे.

(क्यू) "अस्थायी कर्मचारी" याचा अर्थ, अस्थायी पद धारण करणारा किंवा स्थायी पदावर स्थानापन्न असलेला किंवा मंडळाच्या सेवेत त्याच्या नियुक्ती दरम्यान परिविक्षाधीन असलेला कर्मचारी, असा आहे.

***1.*** (आर) एखाद्या श्रेणीमधील "नियमित सेवा" याचा अर्थ त्या श्रेणी मध्ये नियमित नियुक्ती साठी नेमून दिलेल्या कार्यपद्धतीनुसार विनियमांच्या अंतर्गत त्या श्रेणीतील निवड व नियुक्ति झाल्यानंतर त्या श्रेणी मध्ये बजावलेल्या सेवेचा अवधी/ सेवांचे अवधी आणि त्यामध्ये असे अवधी सामिल असतील

(i) विनियमांच्या अधिसूचनेच्यावेळी आधीपासून सेवारत असलेल्यांच्या बाबतीत सेवाज्येष्ठतेच्या उद्देशासाठी लक्षात घेतलेला अवधी.

(ii) असा अवधी ज्यांमध्ये कर्मचारी त्या श्रेणीतील एखादे पद ग्रहण करू शकला असता परंतु रजेवर असल्या कारणाने किंवा अन्य कारणाने असे पद धारण करण्यासाठी उपलब्ध नव्हता.

## ४. <u>नियुक्तीची पध्दत</u>

हे विनियम लागू असलेल्या पदांवरील सर्व नियुक्त्या या विनियमांमधील तरतुदीं अनुसार केल्या जातील. नियुक्ती ही पदोन्नतीने किंवा समायोजनाने किंवा प्रतिनियुक्तीने किंवा सरळ सेवाप्रवेशाने करण्यात यावी. प्रतिनियुक्ती ही, मुख्य बंदर, केंद्र सरकार, राज्य शासन, स्वायत्त संस्था, शासकीय कंपन्या यांमधील कर्मचा-यांमधून, पदासाठी विहित केलेले पात्रता निकष पूर्ण केल्यावर केली जाईल. प्रतिनियुक्तीचा सामान्य कालावधी तीन वर्षांचा आहे, तो चार वर्षांपर्यंत वाढविता येईल. ***2.*** अपवादात्मक परिस्थितीत एखाद्या पदाच्या बाबतीत, ज्याचा पदभोगी याला विभाग प्रमुख मानण्यात येते त्यात केंद्र सरकार द्वारा; आणि विभाग प्रमुखाच्या पदा पेक्षा खालच्या कोणत्याही अन्य पदाच्या बाबतीत अध्यक्षांद्वारा त्यात पाच वर्षांपर्यंत वाढ करता येईल.

## ५. <u>अनुसूची</u>

वर्ग एक च्या पदांच्या संबंधात, नियुक्तीची पद्धत, जसे की, नियुक्ती सरळ सेवाप्रवेशाने किंवा विभागांतर्गत पदोन्नतीने किंवा समायोजनाने किंवा प्रतिनियुक्तीने करणे, पात्रता, वय, शिक्षण, प्रशिक्षण, अनुभवाची आवश्यकता, निवड पदे किंवा निवड पदेतर पदे आणि विविध पदांवरील नियुक्तीशी निगडित इतर बाबी या विनियमांना जोडलेल्या

---

***1.*** TR No. 44 of 16.6.2017 and G.S.R.351 dated 9.4.2018 प्रमाणे जोडले गेले.

***2.*** TR No.239 of 27.3.2015 and G.S.R. 648(E) dated 1.7.2016 प्रमाणे प्रतिस्थापित केले.

अनुसूचीमध्ये दर्शविल्या जातील. वर्ग दोन, वर्ग तीन, आणि वर्ग चारच्या पदांवरील नियुक्तीची पद्धत मंडळाद्वारे वेळोवेळी निर्धारित केल्याप्रमाणे असेल. मुख्य पोर्ट ट्रस्ट अधिनियम, १९६३ च्या कलम २३ मधील तरतुदीं अन्वये तयार केलेल्या कर्मचा-यांची अनुसूची यामध्ये दर्शविलेल्या विविध श्रेणींमधील अधिकृत स्थायी व अस्थायी यांची क्षमता सुध्दा अनुसूचीमध्ये दर्शविली जाईल. या क्षमतेत, मुख्य पोर्ट ट्रस्ट अधिनियम, १९६३ च्या कलम २७ मधील तरतुदीं अन्वये वेळोवेळी बदल करता येईल. सरळ सेवाप्रवेशासठी विहित आवश्यक पात्रता ही पदोन्नतीच्या प्रकरणात अनुसूचीच्या स्तंभ ९ मध्ये दिलेल्या व्याप्तीपर्यंत लागू असेल आणि पदोन्नतीसाठी आवश्यक अनुभव हा अनुसूचीच्या स्तंभ १२ मध्ये विहित केल्याप्रमाणे असेल.

परंतु, विभागप्रमुखांच्या बाबतीत केंद्र सरकारद्वारे विहित केलेल्या उच्च वयोमर्यादेत सवलत दिली जाईल आणि इतर सर्व बाबतीत, अध्यक्षांद्वारे सरळ सेवाप्रवेश/समायोजन/प्रतिनियुक्ती यासाठी पुढील लेखी अभिलिखित कारणांकरीता सवलत दिली जाईल.

(एक) १० वर्षांचा किमान अनुभव विहित केला असल्याच्या बाबतीत ५ वर्षांपर्यंत किंवा त्यापेक्षा अधिक, आणि ५ ते ९ वर्षांचा किमान अनुभव विहित केला असल्याच्या बाबतीत ३ वर्षांपर्यंत.

(दोन) माजी सैनिक असलेल्या उमेदवाराच्या बाबतीत, म्हणजेच भारताच्या संरक्षण दलात त्याने त्याच्या सेवेच्या समाप्तीपर्यंत ६ महिन्यांपेक्षा कमी नसेल इतकी अखंडित सेवा केली असेल अशा उमेदवाराच्या बाबतीत, जेथे रिक्त पद हे, अशा माजी सैनिकासाठी व कारवाईत शहीद झालेल्यांवर अवलंबून असणा-यांसाठी राखीव असलेले रिक्त पद म्हणून भरावयाचे असेल, तेथे अधिक तीन वर्षांपर्यंत आणि, जेथे रिक्त पद हे अराखीव रिक्त पद म्हणून भरावयाचे असेल तेथे त्याने संरक्षण दलात केलेल्या सेवेच्या समाप्ती पर्यंत; आणि

(तीन) अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमाती किंवा इतर मागासवर्गीय उमेदवाराच्या बाबतीत, केंद्र शासनाने या संबंधात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशां अनुसार.

परंतु आणखी असे की, अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींसाठी राखीव असणारी पदे भरण्याकरीता आवश्यक अनुभव धारण करणारे उमेदवार या प्रवर्गांमधून पुरेशा संख्येने उपलब्ध होण्याची शक्यता नाही असे, निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर केंद्र

सरकारचे मत झाल्यास, या प्रवर्गांच्या उमेदवारांच्या बाबतीत केंद्र सरकारच्या स्वेच्छानिर्णयानुसार अनुभवाची आवश्यकता ही शिथिलतायोग्य आहे.

## ६. <u>रिक्त पदांची नामावली</u>

विवक्षित रिक्त पद हे सरळसेवाप्रवेशाने किंवा पदोन्नतीने कसे भरले जाईल हे दर्शविण्यासाठी प्रत्येक श्रेणीकरिता एक नामावली केली जाईल.

तथापि, सरळ सेवा प्रवेशासाठी राखीव असलेले पद जर सरळ सेवाप्रवेशाने भरले जाऊ शकत नसेल तर ते पदोन्नतीने भरले जावे आणि त्यापुढील रिक्त पद हे सरळ सेवा प्रवेशाने भरण्यात यावे. पदोन्नतीसाठी राखीव असलेल्या परंतु पदोन्नतीने भरले जाऊ शकत नसलेल्या पदाच्या बाबतीत हीच पध्दत अवलंबण्यात यावी.

## ७. <u>आरक्षण</u>

(१) केंद्र सरकारने, अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींच्या बाजूने, पदभरती ही सरळसेवा प्रवेशाने किंवा पदोन्नतीने कशी केली जावी याबाबत, त्याच्या अंतर्गत असलेल्या पदांच्या आरक्षणाकरिता वेळोवेळी दिलेले आदेश, या विनियमांखाली येणा-या सर्व नियुक्त्यांना योग्य त्या फेरफरांसह लागू होतील.

(२) केंद्र सरकारने, इतर मागास प्रवर्ग, माजी सैनिक व कारवाईत शहीद झालेल्यांवर अवलंबून असलेले, खेळाडू व शारीरिकदृष्ट्या अपंग व्यक्ती यांच्या बाजूने, त्याच्या अंतर्गत असलेल्या पदांच्या आरक्षणाकरिता वेळोवेळी दिलेले आदेशसुध्दा या विनियमाखाली येणा-या आणि ज्यांकरीता सरळसेवा भरती केली जाते अशा नियुक्त्यांना योग्य त्या फेरफारांसह लागू असतील.

## ८. <u>सरळ सेवा प्रवेशासाठी, राष्ट्रीयत्व, चारित्र्य, शारीरिक पात्रता इत्यादि</u>

(१) कोणतीही श्रेणी किंवा पदावरील सरळ सेवा प्रवेशासाठी पात्र होण्याकरिता उमेदवार हा -

(अ) भारताचा नागरिक; किंवा

(ब) नेपाळचा नागरिक; किंवा

(क) भूतानचा नागरिक; किंवा

(ड) भारतात कायमस्वरुपी राहण्याच्या उद्देशाने, १ जानेवारी **१९६२** च्या पूर्वी भारतात आलेला तिबेटी निर्वासित; किंवा

(ई) भारतात कायमस्वरुपी राहण्याच्या उद्देशाने पाकिस्तान, ब्रम्हदेश, श्रीलंका किंवा केनिया, युगांडा हे पूर्व आफ्रीकन देश, टांझानियाचे संयुक्त गणराज्य,

झांबिया, मालावी, झैरे व इथेओपिया आणि व्हिएतनाम येथून स्थलांतरित होऊन आलेली मूळ भारतीय वंशाची व्यक्ती असणे आवश्यक आहे.

परंतु. प्रकार (अ) चा उमेदवार, अध्यक्षांनी वेळोवेळी आवश्यक केल्याप्रमाणे त्याच्या राष्ट्रीयत्वाचा असा पुरावा सादर करील:

परंतु आणखी असे की, प्रकार (ब), (क), (ड) आणि (ई) च्या उमेदवारांना भारत सरकारने पात्रता प्रमाणपत्र दिलेले असेल:

परंतु तसेच, ज्या उमेदवाराच्या बाबतीत राष्ट्रीयत्वाचा पुरवा किंवा पात्रता प्रमाणपत्र आवश्यक असेल त्यांना, यथास्थिति, केंद्र सरकारकडून त्यांच्या बाजूचे आवश्यक प्रमाणपत्र त्यांच्याकडून सादर करुन घेण्याचे प्रलंबित ठेऊन तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती द्यावी. अशा प्रकरणातील तात्पुरत्या नियुक्तीचा कालावधी एका वर्षापेक्षा अधिक नसावा.

(२) जेव्हा विशिष्ट स्वरुपाच्या कामासाठी नियुक्ती करावयाची असेल आणि या विनियमांतील अटींची पूर्तता करणारा योग्य उमेदवार मिळणे व्यवहार्य नसेल तेव्हा अध्यक्षांनी, केंद्र सरकारच्या पूर्वसंमतीने उप विनियम (१) मधील कोणतीही अट सुधारित करावी किंवा सोडून द्यावी.

(३) कोणतीही व्यक्ती,

(अ) पती किंवा पत्नी जिवंत असणा-या व्यक्तीशी विवाहित; किंवा

(ब) ज्याचा/ज्याची पती किंवा पत्नी जिवंत असताना कोणत्याही व्यक्तीशी विवाहित असताना हे विनियम लागू असणा-या कोणत्याही श्रेणी अथवा पदावर नियुक्तीस पात्र असणार नाहीत अशी व्यक्ती; असता कामा नये.

परंतु, विभाग प्रमुखाच्या बाबतीत केंद्र सरकार व इतर सर्व बाबतीत अध्यक्ष, जर त्यांचे अशा व्यक्तीस आणि विवाहातील दुस-या पक्षास लागू असणा-या व्यक्तिविषयक कायद्याअन्वये असा विवाह हा परवानगी योग्य आहे आणि असे करण्यामागे इतरही कारणे आहेत, असे समाधान झाले तर या उप विनियमाच्या कार्यवाहीतून ते कोणत्याही व्यक्तीस सूट देतील.

(४) उमेदवाराने, कोणतीही श्रेणी किंवा पदावरील नियुक्तीकरिता त्याचे चारित्र्य व पूर्वचरित हे योग्य असल्याबाबत नियुक्ती प्राधिका-याचे समाधान करणे अत्यावश्यक आहे. नैतिक अध:पतनाचा समावेश असलेल्या एखाद्या अपराधात न्यायालयाने दोषी ठरवलेला किंवा दिवाळखोरी जाहीर केलेला कोणताही उमेदवार श्रेणी किंवा पदावरील नियुक्तीसाठी पात्र असणार नाही.

(५) उमेदवाराचे शारीरिक व मानसिक आरोग्य चांगले असावे आणि मंडळाचा एक कर्मचारी म्हणून त्याच्या कर्तव्यात बाधा निर्माण करुन त्याला कर्तव्य करण्यापासून वंचित करु शकेल अशा शारीरिक व्यंगापासून मुक्त असावा. विभागप्रमुखांचा बाबतीत केंद्र सरकारद्वारे आणि इतर सर्व बाबतीत अध्यक्षांद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा वैद्यकीय तपासणीनंतर या अटींची समाधानकारक पूर्तता करु न शकणा-या उमेदवाराची नियुक्ती केली जाणार नाही.

(६) या विनियमांच्या सर्व किंवा कोणतीही अट उमेदवाराने समाधानकारकरित्या पूर्ण करण्याबाबत जर कोणताही प्रश्न उपस्थित झाला तर त्याबाबतीत, विभागप्रमुखांच्या प्रकरणात केंद्र शासनाकडून आणि इतर सर्व प्रकरणात अध्यक्षांकडून निर्णय केला जाईल.

## ९. <u>सरळ सेवा प्रवेशासाठी सध्या कार्यरत कर्मचा-याची पात्रता.</u>

***1.** सध्या सेवेत असलेल्या कर्मचा-यांकरिता सरळ सेवा प्रवेशासाठी पात्रता - सरळ सेवा प्रवेशाने भरण्यात येणा-या पदांकरिता जाहिरात दिल्यावर, कोणत्याही मुख्य पोर्ट ट्रस्टच्या बोर्डाचे विहित पात्रता आणि अनुभव असणारे कर्मचारी अर्ज करु शकतील, परंतु अशा प्रकरणात त्यांची वयो मर्यादा पंचावन्न वर्षांपेक्षा जास्त नसावी.

## १०. <u>रिक्त पदांची जाहिरात</u>

(१) सरळ सेवा प्रवेशाने भरावयाच्या वर्ग तीन व वर्ग चार च्या रिक्त पदांबाबत स्थानिक सेवानियोजन केंद्रास सूचित करावे. त्या सोबतच, विस्तृत प्रसिध्दीसाठी, सेवाप्रवेश सूचना सेवायोजन बातमीपत्रात प्रकाशित करावी आणि कार्यालयाच्या सूचना फलकावर प्रदर्शित करावी. अर्ज करणा-या सर्व उमेदवारांचे अर्ज विचारात घ्यावेत. पात्र आणि योग्य उमेदवार पुरेशा संख्येने उपलब्ध न होण्याच्या बाबतीत, राज्यात प्रकाशित होणा-या वर्तमानपत्रात रिक्त पदांची जाहिरात द्यावी.

सरळ सेवाप्रवेशाने भरावयाच्या वर्ग एक व वर्ग दोन च्या पदांची जाहिरात राष्ट्रीय आणि स्थानिक दैनिकांत आणि/किंवा सेवायोजन बातमीपत्रात द्यावी.

(२) पात्रता, अनुभव आणि वय निश्चित करण्याचा निर्णायक दिनांक हा पद अधिसूचित/विज्ञापित केल्याच्या बाबतीत महिन्याचा प्रथम दिवस असेल, याखेरीज अन्यथा विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे असेल.

---

***1.** TR No. 157 dated 27.11.2017 and G.S.R. 776(E) dated 14.8.2018 प्रमाणे प्रतिस्थापित केले.

## ११. विशिष्ट बाबतीत लेखी किंवा कौशल्य चाचण्यांचे आयोजन:

विशिष्ट बाबतीत, लेखी किंवा कौशल्य चाचणी किंवा दोन्ही घ्यावात किंवा कसे आणि चाचणी घेणा-या अधिका-याचे नाव आणि चाचणी ज्याप्रकारे घेतली जाईल ती पध्दत व त्या संबंधातील इतर सविस्तर बाबींविषयी नियुक्ती प्राधिका-यांनी निर्णय घ्यावा. लेखी किंवा कौशल्य चाचणी आयोजित करण्याचे काम एखाद्या संमंत्रकास किंवा संमंत्रक व्यवसाय संस्थेस देण्याचे नियुक्ती प्राधिका-यास स्वातंत्र्य असेल.

## १२. सेवा निवड समिति

(१) उप विनियम (२) मध्ये नमूद केल्याप्रमाणे, प्रत्येक श्रेणी किंवा पदाकरिता सरळ सेवाप्रवेशाने वेगवेगळ्या पदांवर करावयाच्या नियुक्त्यांकरिता उमेदवारांची निवड करण्यासाठी पात्र उमेदवारांच्या मुलाखती आयोजित करण्यासाठी एक सेवा निवड समिती असावी.

(२) उप-विनियम (१) मध्ये संदर्भित केल्याप्रमाणे पदांची श्रेणी व त्यानुसार सेवा निवड समित्यांची रचना पुढीलप्रमाणे असावी.

### (अ) विभागप्रमुखांकरीता:

| | | | |
|---|---|---|---|
| ***1.*** (एक) | संयुक्त सचिव (पीएचआरडी), पोतपरिवहन मंत्रालय | - | अध्यक्ष |
| (दोन) | अध्यक्ष, मुंबई पोर्ट ट्रस्ट | - | सदस्य |
| (तीन) | कोणत्याही इतर बंदराचा अध्यक्ष किंवा अधिकारी | - | सदस्य |
| (चार) | नौवहन मंत्रालयाने नामनिर्देशित केलेला अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती व इतर मागासवर्गाचा प्रतिनिधी | - | सदस्य |

### ***2.*** (ब)ज्यांची कमाल वेतनश्रेणी रु.४६५०० पेक्षा अधिक आहे अशा प्रथम श्रेणी पदांकरीता (१.१.२००७ पासूनची वेतन रचना):

| | | | |
|---|---|---|---|
| (एक) | उपाध्यक्ष | - | अध्यक्ष |
| ***3.*** (दोन) | सामान्य प्रशासन विभागाचा प्रभारी विभाग प्रमुख | - | सदस्य |
| (तीन) | रिक्त पद ज्या विभागातील आहे त्या विभागाचा प्रभारी विभागप्रमुख | - | सदस्य |

***1.*** TR No. 259 dated 27.3.2015 and G.S.R. 603(E) dated 31.7.2015 प्रमाणे प्रतिस्थापित केले.
***2,3.*** TR No. 39 dated 13.8.2015and G.S.R.(E)1434 dated 20.11.2017 प्रमाणे प्रतिस्थापित केले.

(चार) अध्यक्षांनी नामनिर्देशित केलेला
अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती व इतर
मागासवर्गाचा प्रतिनिधी - सदस्य

**(क) <u>वरील पदांव्यतिरिक्त असलेल्या वर्ग - एक च्या आणि वर्ग दोन च्या पदांकरीता:</u>**

***1.*** (एक) सामान्य प्रशासन विभागाचा प्रभारी विभाग प्रमुख - अध्यक्ष

***2.*** (दोन) अध्यक्षांनी नामनिर्देशित केल्यानुसार
आर्थिक सल्लागार व मुख्य लेखाधिकारी किंवा उप संरक्षक - सदस्य

(तीन) रिक्त पद ज्या विभागातील आहे त्या
विभागाचा प्रभारी विभागप्रमुख - सदस्य

(चार) अध्यक्षांनी नामनिर्देशित केलेला
अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती व इतर
मागासवर्गाचा प्रतिनिधी - सदस्य

**<u>(ड) वर्ग - तीन च्या पदांकरीता</u>**

***3.*** (एक) सामान्य प्रशासन विभागाचा उप प्रमुखाहून कमी श्रेणी
नसलेला अधिकारी - अध्यक्ष

(दोन) रिक्त पद ज्या विभागातील आहे त्या
उप प्रमुखाहून कमी श्रेणी नसलेला अधिकारी - सदस्य

(तीन) अध्यक्षांनी नामनिर्देशित केलेला
मुंबई पोर्ट ट्रस्ट च्या इतर कोणत्याही विभागाचा
उप प्रमुखाहून कमी श्रेणी नसलेला एक अधिकारी - सदस्य

(चार) अध्यक्षांनी नामनिर्देशित केलेला
अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती व इतर
मागासवर्गाचा प्रतिनिधी - सदस्य

**<u>(ई) वर्ग - चार च्या पदांकरीता</u>**

***4.*** (एक) सामान्य प्रशासन विभागाचा उप प्रमुखाहून कमी श्रेणी
असलेला वर्ग एक चा अधिकारी - अध्यक्ष

(दोन) रिक्त पद ज्या विभागातील आहे त्या विभागाच्या
विभाग उप प्रमुखाहून कमी श्रेणी असलेला
वर्ग एक चा अधिकारी - सदस्य

---

***1,2,3,4.*** TR No. 39 dated 13.8.2015and G.S.R.(E)1434 dated 20.11.2017 प्रमाणे प्रतिस्थापित केले.

(तीन) अध्यक्षांनी नामनिर्देशित केलेला
मुंबई पोर्ट ट्रस्ट च्या इतर कोणत्याही विभागाचा
उप प्रमुखाहून कमी श्रेणी असलेला वर्ग एक चा
अधिकारी - सदस्य

(चार) अध्यक्षांनी नामनिर्देशित केलेला
अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती व इतर
मागासवर्गाचा प्रतिनिधी - सदस्य

नियुक्ती प्राधिकारी मंडळाच्या सेवेत नसलेल्या व अशा संबंधित क्षेत्रातील विशेषज्ञ असलेल्या व्यक्तीस सुध्दा सेवा निवड समितीचा सदस्य होण्यासाठी नामनिर्देशित करु शकेल. जेथे सेवा निवड समितीचा कोणताही सदस्य उपलब्ध नसेल तेथे त्याच्या जागी बैठकीस उपस्थित राहण्याकरिता त्याच्या उचित स्तरावरील इतर अधिका-यास नियुक्ती प्राधिका-याने नामनिर्देशित करावे.

(३) जेव्हा एका पेक्षा अधिक विभागातील समान श्रेणींमधील रिक्त पदांची सामायिकरित्या निवड करावयाची असेल तेव्हा अशा प्रत्येक प्रकरणात समितीच्या रचनेचा निर्णय अध्यक्षांनी घ्यावा.

## १३. <u>निवड सूची</u>

सेवा निवड समितीने, सरळ सेवा प्रवेशासाठी राखून ठेवलेल्या पदांवरील नियुक्त्यांकरिता विचारार्थ घेण्यासाठी, तिच्याद्वारे न्यायनिर्णित केल्याप्रमाणे, निवडलेल्या उमेदवारांच्या नावांचा निवड सूचीमध्ये समावेश करण्याकरिता, गुणानुक्रमे शिफारस करावी. अशी सूची नियुक्ती प्राधिका-याद्वारे मान्य करण्यात आल्याच्या दिनांकापासून **१२** महिन्याच्या कालावधीसाठी वैध मानली जाईल. या निवड सूचीची वैधता, सहा महिन्यांपेक्षा कमी नसेल इतक्या कालावधीपर्यंत किंवा नव्या निवड सूचीला मान्यता देण्यात येईपर्यंत, यापैकी जे आधी असेल तोपर्यंत वाढवण्याचे स्वातंत्र नियुक्ती प्राधिका-यास आहे.

## १४. <u>सेवा निवड समितीच्या शिफारशी विचारात घेणे आणि तदर्थ नेमणूका करणे</u>

नियुक्ती प्राधिका-याद्वारे सरळ सेवाप्रवेशाने होणा-या सर्व नियुक्त्या संबंधित सेवा निवड समितीच्या शिफारशीनुसार केल्या पाहिजेत.

परंतु, सेवा निवड समितीच्या शिफारशी, कारणांच्या लेखी निवेदानांसह नाकारण्याचे, नियुक्ती प्राधिका-यास स्वातंत्र्य असेल;

परंतु आणखी असे की, जेथे नियुक्ती प्राधिकरी हा अध्यक्षांहून दुय्यम असेल आणि कोणत्याही प्रकरणातील अशा शिफारशींशी तो असहमत असेल तेथे अशा असहमतींच्या कारणांचे लेखी निवेदन करुन ते प्रकरण अध्यक्षांकडे याबाबत निर्णय घेण्यासाठी सादर करावे.

परंतु तसेच, निव्वळ अस्थायी पदाच्या बाबतीत, जेथे रजा मुदती रिक्त पद किंवा सरळ सेवा प्रवेशाकरीता राखून ठेवलेले रिक्त पद तात्काळ भरण्याची आवश्यकता असेल, त्याबाबतीत अध्यक्ष, एखाद्या पात्र व्यक्तीस रिक्त पद भरण्याकरिता सहा महिन्यांच्या आणि एक वर्षाहून अधिक नसेल इतक्या कालावधीसाठी एक वेळेस तदर्थ स्वरुपात पुढील अटींच्या अधीन राहून नियुक्त करतील;

(१) तदर्थ नेमणूक, जेथे अपरिहार्य असेल तेथेच, सेवाप्रवेश नियमांमध्ये दिलेल्या पात्रता, अनुभव यांची काटेकोरपणे पूर्तता करण्याच्या अधीन राहून केली जावी.

(२) तात्पुरत्या पदावर केलेल्या नियुक्तीचा कालावधी हा पदावधीपेक्षा अधिक नसेल.

(३) तात्पुरत्या नियुक्त्यांच्या इतर प्रकरणात शक्य तितक्या लवकर निवडसूची मधून नियमित नियुक्त्यांद्वारे त्या जागी नव्याने नेमणुका केल्या पाहीजे.

## १५. <u>वशिलेबाजी ही अपात्रता असणे</u>

पदावरील नियुक्तीसाठी किंवा पदोन्नतीसाठी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रितीने एखाद्या व्यक्तीच्या बाजूने अनुकूल मतासाठी पाठिंबा मिळविण्याकरिता कोणतेही प्रयत्न करण्याची कृती ही त्या व्यक्तीस नियुक्ती किंवा पदोन्नतीसाठी अपात्र ठरवणारी असेल.

## १६. <u>सत्य लपविणे ही अपात्रता असणे</u>

कोणत्याही उमेदवाराने कोणतीही असत्य माहिती सादर केल्याचे किंवा जी माहिती उघड झाल्यास तो श्रेणी किंवा पदावर नियुक्ती मिळण्यापासून सामान्यपणे प्रतिरोधित करण्यात आला असता अशी चारित्र्यविषयक महत्त्वाची माहिती दडवून ठेवल्याचे आढळून आल्यास त्याला अपात्र ठरविण्यात येईल, आणि जर तो नियुक्त असेल तर त्यास सेवेतून बडतर्फ केले जाईल.

## १७. <u>नियुक्ती आदेश रद्द करणे</u>

जर, सरळ सेवा प्रवेशासाठी राखून ठेवलेल्या पदासाठी निवड झालेला उमेदवार, नियुक्ती आदेशात नमूद केलेल्या दिनांकाच्या आत आणि जेथे असा दिनांक नमूद केलेला नसेल त्याबाबतीत नियुक्ती आदेश जारी केल्यापासून ३० दिवसांच्या आत किंवा नियुक्ती प्राधिका-याने सहमती दिलेल्या वाढीव कालावधीच्या आत कर्तव्यार्थ रुजू होण्यात अपयशी ठरला तर नियुक्ती आदेश रद्द झाले असल्याचे मानले जाईल.

## १८. <u>मुलाखतीस उपस्थित राहण्याकरिता प्रवास भत्ता देणे</u>

सरळ सेवा प्रवेशाने भरल्या जाणा-या पदांच्या बाबतीत, लेखी व प्रात्याक्षिक चाचण्या किंवा मुलाखतीसाठी उमेदवारांना (आधीपासून मंडळाच्या सेवेत असणा-या व्यक्तींसह) स्वखर्चाने प्रवास करावा लागेल. तथापि, लेखी किंवा कल चाचण्यांसाठी किंवा मुलाखतीसाठी निमंत्रित केलेल्या अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमातींच्या उमेदवारांना, या संबंधात केंद्र सरकारने वेळोवेळी दिलेल्या आदेशांनुसार प्रवास भत्ता देण्यात यावा.

## १९. <u>परिविक्षाधीन कालावधी</u>

(१) रु.१६०००–४००–२०८०० आणि त्यापेक्षा अधिक वेतनश्रेणी असणा-या, विभागप्रमुख व विभाग उपप्रमुखाच्या पदावर, संयुक्त सेवाप्रवेश पध्दतीने, समायोजन तत्वावर नियुक्त केलेल्या व्यक्ती वगळता, सरळ सेवाप्रवेश किंवा पदोन्नती किंवा समायोजन याद्वारे, नियुक्त व्यक्तीचा परिवीक्षाधीन कालावधी हा उप-विनियम (२) व (३) च्या अधीन राहून दोन वर्षांचा असेल.

परंतु, जेथे नियुक्ती ही, तिच्या नियुक्ती आदेशात विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीपुरती असेल तेथे, नियुक्ती प्राधिका-यांद्वारे अशा कालवधीत वाढ करण्यात आल्या व्यतिरिक्त, अशी नियुक्ती ही असा विनिर्दिष्ट कालावधी संपल्यानंतर संपुष्टात येईल.

परंतु, जेव्हा नियुक्ती ही सरळ सेवाप्रवेशाने केलेली असेल आणि त्या पदाची कमाल वेतनश्रेणी रु.**११९७५** पेक्षा अधिक नसेल तेव्हा परिवीक्षाधीन कालावधी हा एक वर्षाचा राहील.

परंतु, वर्ग-तीन व वर्ग - चार च्या श्रेणींअंतर्गत पदोन्नतीद्वारे नियुक्तीच्या बाबतीत कोणताही परिविक्षाधीन कालावधी असणार नाही.

परंतु आणखी असे की, जर एखाद्या श्रेणी किंवा पदावर परिविक्षाधीन कालावधीत असणा-या कर्मचा-यास त्यापेक्षा वरच्या श्रेणी किंवा पदावर स्थानापन्न केलेले असल्यास त्याच्या उच्च श्रेणी किंवा पदावरील नियुक्तीचा कालावधी त्याच्या निम्न श्रेणी किंवा पदावरील परिविक्षाधीन कालावधी पूर्ण करण्यासाठी मोजता येईल. त्याचप्रकारे, जर एखाद्या कर्मचा-याची यापूर्वी एखाद्या श्रेणी किंवा पदावर स्थानापन्न म्हणून नियुक्ती करण्यात आलेली असेल व त्याची त्याच श्रेणी किंवा पदावर परिविक्षाधीन नियुक्ती झाल्यास त्याचा अशा स्थानापन्न नियुक्तीचा कालावधी (तदर्थ सेवा वगळून) श्रेणी किंवा पदाचा परिविक्षाधीन कालावधी पूर्ण करण्यासाठी मोजता येईल.

(२) नियुक्ती प्राधिका-यास योग्य वाटल्यास परिविक्षाधीन कालावधीत विनिर्दिष्ट कालावधीकरीता एक वेळा वाढ करता येईल, परंतु अशा वाढीचा कालावधी, जेथे कर्मचा-याविरुध्द प्रलंबित विभागीय किंवा कायदेशीर कारवाईच्या कारणास्तव आवश्यक असेल ते खेरीज करुन, एक वर्षापेक्षा अधिक असणार नाही.

(३) कर्मचा-यास त्याच्या परिविक्षाधीन कालावधी दरम्यान नियुक्ती प्राधिकारी, वेळोवेळी, याबाबतीत विनिर्दिष्ट करील असे विभागीय प्रशिक्षण घेणे व अशा विभागीय चाचण्या उत्तीर्ण करणे आवश्यक राहील.

## २०. परिविक्षाधीन कर्मचा-यांस कायम करणे

(१) सर्वसाधारण

(एक) कर्मचा-यास त्याच्या सेवेत त्याच्या सेवा प्रवेशाच्या श्रेणीमध्ये फक्त एकादाच कायम केले जाईल.

(दोन) स्थायीकरण हे श्रेणीतील कायम रिक्त पदाच्या उपलब्धतेपासून खंडित केलेले आहे. दुस-या शब्दात ज्या आधिका-याने परिविक्षाधीन कालावधी यशस्वीरित्या पूर्ण केला असेल त्याला कायम करावे.

(२) प्रथमत: नेमणूक करण्यात आलेल्या श्रेणीत कायम करणे.

(एक) नियुक्त व्यक्तीने परिवीक्षाधीन कालावधी समाधानकारकरित्या पूर्ण केला असला पाहीजे.

(दोन) कायम करण्यासाठीचे प्रकरण हे विभागीय पदोन्नती समितीसमोर ठेवले जाईल.

(तीन) प्रकरण सर्व बाजूंनी निर्दोष ठरल्यानंतर कायम करण्याबाबतचा विनिर्दिष्ट आदेश जारी केला जाईल.

(३) <u>पदोन्नती बाबत</u>

(एक) जर सेवाप्रवेश नियमात कोणतीही पदोन्नती विहित केलेली नसेल, तर अधिका-यास नियमित आधारावर, (विहित विभागीय पदोन्नती समिती इत्यादी, पध्दतीचा अवलंब केल्यानंतर) पदोन्नती देण्यात येईल व त्या श्रेणीत कायम झालेल्या व्यक्तीस मिळाले असते ते सर्व फायदे त्यास मिळतील.

(दोन) जेथे पदोन्नती विहित केलेली असेल, तेथे नियुक्ती प्राधिकारी स्वत: परिविक्षाधीन कालावधी संपल्यानंतर अधिका-याचे काम व वर्तणूक निर्धारित करील आणि अधिकारी उच्च श्रेणी धारण करण्यास सक्षम असल्याचा निष्कर्ष निघाल्यास, तो, संबंधित व्यक्तीने परिविक्षाधीन कालावधी यशस्वीरित्या पूर्ण केल्याचे जाहिर करणारा आदेश काढेल. जर, अधिका-याचे काम समाधानकारक नसेल किंवा अजून काही काळ त्याचे अवलोकन करण्याची गरज असेल तर तो, त्यास ज्या पदावरुन पदोन्नत करण्यात आले होते त्या पदावर किंवा त्या श्रेणीवर प्रत्यावर्तित करील किंवा प्रकरणपरत्वे त्याच्या परिविक्षाधीन कालावधीत वाढ करील.

अधिका-याने परिविक्षाधीन कालावधी समाधानकारकरित्या पूर्ण केल्याचे जाहिर झाल्याशिवाय पदोन्नती कायम होत नाही, म्हणून त्याच्या कामगिरीची तपासणी काटेकोरपणे केली पाहिजे आणि परिविक्षाधीन कालावधी दरम्यान अधिका-याचे काम समाधान कारक नसल्यास त्याला जेथून पदोन्नत करण्यात आले होते त्या पदावर किंवा श्रेणीवर कुठल्याही संदेहाविना प्रत्यावर्तित केले.

<u>**परिविक्षार्थीस कायम करणे-**</u> पदोन्नतीच्या निश्चित अटींसह सरळ सेवा प्रवेशाने स्थायी पदावर नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीस त्याने परिविक्षाधीन कालवधी समाधानकारकरित्या पूर्ण केल्याच्या दिनांकपासून श्रेणीमध्ये कायम करण्यात येईल. त्याला कायम करायचे किंवा त्याच्या परिविक्षाधीन कालावधीत वाढ करायची याचा निर्णय प्राथमिक परिविक्षाधीन कालावधी पूर्ण झाल्यानंतर विनाविलंब, म्हणजे सामान्यत: ६ ते ८ आठवड्यांच्या आत आणि कालावधी वाढवण्याच्या बाबतीत तत्संबंधी कारणे कर्मचा-यास एकत्रितरित्या सूचित करुन, घेतला पाहिजे.

जरी सरळ सेवा प्रवेशितांच्या परिविक्षाधीन कालावधीच्या समाप्तीनंतर विभागीय पदोन्नती समितीची बैठक झाली असली तरी सुध्दा, पदोन्नतीच्या निश्चित अटींसह स्थायी पदावर नियुक्त केलेल्या व्यक्तीस, त्याने परिविक्षाधीन कालावधी यशस्वीरित्या पूर्ण केल्याच्या दिनांकापासून क्षेणीमध्ये कायम करण्यात येईल. समाधानकारक प्रगती न करणा-या किंवा सेवेसाठी सक्षम नसल्याचे दिसून आलेल्या परिविक्षार्थीस, त्याचा प्राथमिक परिविक्षाधीन कालावधी संपण्यापूर्वी पुरेसे आधी, त्याच्या त्रुटींविषयी सूचित करावे जेणेकरुन तो स्व-सुधारणे बाबत कठोर प्रयत्न करु शकेल.

पदोन्नतीच्या बाबतीत, विभागीय पदोन्नती समितीने कर्मचा-याच्या इतर संबंधित गुणांचे निर्धारण न करता फक्त त्याने परिविक्षाधीन कालावधी समाधानकारकरित्या पूर्ण केल्याचे जाहिर करावे किंवा कसे याबाबतच निर्णय द्यावा. जर परिविक्षार्थीची कामगिरी समाधानकारक नसेल तर विभागीय पदोन्नती समितीने परिविक्षाधीन कालावधित वाढ करावी किंवा कसे, किंवा त्यास सेवेतून मुक्त करावे किंवा कसे याबाबत सल्ला द्यावा.

## २१. <u>पदोन्नत कर्मचा-यास कार्यमुक्त किंवा प्रत्यावर्तित करणे.</u>

(१) जर एखादा कर्मचारी त्याच्या प्रथम नियुक्तीच्या वेळी विनियम **१९** मध्ये विहित केल्याप्रमाणे परिविक्षाधीन कालावधीच्या अखेरीस, त्याचे वर्तन किंवा कामगिरीच्या आधारे कायम करण्यासाठी सक्षम ठरला नाही तर त्याला मंडळाच्या सेवेतून मुक्त करण्यात यावे.

(२) जर एखाद्या कर्मचा-याचा पदावर धारणाधिकार असेल आणि त्याने नियुक्ती प्राधिका-याचे समाधान होईल अशा रितीने विनियम **१९** मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे परिविक्षाधिन कालावधी पूर्ण केला नसेल तर त्याला त्याचा धारणाधिकार असलेल्या पदावर प्रत्यावर्तित करावे.

(३) जर एखादा कर्मचारी पदावरील परिविक्षाधीन कालावधीदरम्यान कामगिरी किंवा वर्तणूक किंवा विहित केलेल्या विभागीय परीक्षेत उत्तीर्ण होण्यात अपयश येणे या आधारवर यापुढे पद धारण करण्यास अयोग्य ठरल्यास व त्याचा कोणत्याही पदावर धारणाधिकार नसल्यास त्यास कोणत्याही क्षणी कार्यमुक्त करण्यात येईल किंवा त्याचा ज्या पदावर धारणाधिकार असेल त्या पदावर प्रत्यावर्तित करण्यात येईल.

## २२. <u>विवक्षित बाबतीत, पदोन्नती, कायम करणे या करिता विभागीय चाचणी.</u>

अध्यक्षाने, वेळोवेळी पदे, त्यावर कायम करणे किंवा पदोन्नती ही कोणतीही असल्यास, कोणती विभागीय पात्रता चाचणी उत्तीर्ण करण्याच्या अधीन असतील ते विनिर्दिष्ट करावे. अध्यक्षाने, वेळोवेळी, चाचणी आयोजित करण्याची पध्दत, चाचणीचा अभ्यासक्रम, ज्या ठराविक कालावधीच्या अंतराने चाचणी झाली पाहिजे तो कालावधी, ज्याच्या आत उमेदवाराने चाचणी उत्तीर्ण करणे आवश्यक असेल असा कालावधी इत्यादी या सारखे विभागीय चाचणीचे विवरण सुध्दा विनिर्दिष्ट करावे.

## २३. <u>विभागीय चाचणीत अयशस्वी ठरल्यास प्रत्यावर्तन.</u>

पदावर पदोन्नती देण्यात आलेल्या कर्मचा-याने, अध्यक्षांनी वेळोवेळी विनिर्दिष्ट केलेली अशी, कोणतीही असल्यास, विभागीय पात्रता चाचणी ते विनिर्दिष्ट करतील, अशा कालावधीच्या आत उत्तीर्ण केली पाहिजे अन्यथा कर्मचा-यास प्रत्यावर्तित करण्यात येईल.

जेव्हा वरच्या पदावरील पदोन्नतीसाठी, एक पूर्ववर्ती अट म्हणून चाचणी उत्तीर्ण करणे विनिर्दिष्ट केले असेल तेव्हा कर्मचा-याने विहित चाचणी उत्तीर्ण करेपर्यंत त्याचा अशा पदावरील पदोन्नतीकरीता विचार केला जाणार नाही.

## २४. सेवाज्येष्ठता यादी

प्रत्येक श्रेणीकरीता, कर्मचा-यांची परस्पर सेवाज्येष्ठता दर्शविणारी एक अद्ययावत श्रेणीसूची तयार करावी. सूची मध्ये प्रत्येक श्रेणीतील स्थायी व तात्पुरते कर्मचारी स्वतंत्रपणे दर्शविले पाहिजेत. ही सूची प्रत्येक वर्षी फिरवली पाहिजे.

## २५. सेवाज्येष्ठतेची निश्चिती

(१) पदावर सरळ सेवेने प्रवेशित व्यक्ती आणि विभागीय पदोन्नतीच्या आधारे नियुक्त व्यक्तीची सेवाज्येष्ठता ही, अनुसूचीत दर्शविल्याप्रमाणे सरळ सेवा प्रवेश व पदोन्नतीसाठी राखीव श्रेणींमधील रिक्त पदांच्या कोट्याच्या आधारावर, पदोन्नत व सरळ सेवाप्रवेशित या दोहोंमधील रिक्त पदांचा, आळीपाळीनुसार असलेल्या परस्पर सेवाज्येष्ठतेने नेमून दिली पाहिजे. ज्या प्रकरणांमध्ये पदांची अदलाबदल ही विनियम ६ नुसार करण्यात आली असेल त्या प्रकरणांमध्ये वरिष्ठता ही पद भरण्याच्या प्रकारानुसार असेल.

(२) सरळ सेवाप्रवेशितांना परीक्षा किंवा मुलाखत किंवा दोन्हींमधील त्यांच्या कामगिरीच्या आधारे त्यांना निवडसूचीत देण्यात आलेल्या स्थानाच्या अनुक्रमानुसार परस्परांसह श्रेणीबध्द करावे, आधीच्या निवडसूचीमधील प्रवेशितांना नंतरच्या निवडसूची मधील प्रवेशितांहून सेवाज्येष्ठ म्हणून श्रेणीबध्द करण्यात येईल.

(३) रिक्त पदांच्या पदोन्नती कोट्यानुसार नियुक्त केलेल्या व्यक्तींना विभागीय पदोन्नती समितीद्वारे त्यांना पदोन्नतीसाठी ज्या क्रमाने अभिलिखित करण्यात आले असेल त्याक्रमानुसार परस्परांसह श्रेणीबध्द करावे.

(४) वरील उप-विनियम (१) ते (३) मध्ये काहीही नमूद असले तरीही, या विनियमांच्या प्रारंभापूर्वी आधीच निर्धारित केलेली सेवाज्येष्ठता अबाधित राहील.

## २६. विभागीय पदोन्नती समिती

(१) या विनियमांनुसार, पदोन्नतीद्वारे, वेगवेगळ्या पदांवरील नियुक्त्यांकरिता, प्रत्येक श्रेणी किंवा पदासाठी, कर्मचा-यांच्या एका नामिकेची शिफारस करण्याकरीता एक विभागीय पदोन्नती समिती असेल.

(२) विभागीय पदोन्नती समितीची रचना ही, विनियम १२ मध्ये निर्धारित केल्याप्रमाणे सेवानिवड समितीसारखीच असेल आणि नामिकेची विधिग्राह्यता ही विनियम १३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे त्यासारखीच असेल.

## २७. <u>पदोन्नतीसाठीचे निवड क्षेत्र</u>

(१) जेथे श्रेणीतील एक किंवा पदे, विहित सेवाप्रवेश नियमांनुसार पूरक श्रेणी मध्ये पद धारण करणा-या कर्मचा-यांमधून निवड पध्दतीने पदोन्नतीद्वारा भरणे आवश्यक असेल तेथे पात्र पदे धारण करणा-या आणि पदोन्नतीकरीता विहित पात्रता व अनुभव असणा-या प्रतिफल क्षेत्रा अंतर्गत येणा-या कर्मचा-यांचा पदोन्नतीसाठी विचार करावा.

(२) निवड पध्दतीच्या माध्यमातून पदोन्नतीसाठी कर्मचा-यांची शिफारस करतांना पुढील प्रक्रियेचा अवलंब करण्यात यावा.

(अ) विभागीय पदोन्नती समितीने, विहित स्थिरचिन्ह आणि श्रेणी अनुसार ज्यांचे पदोन्नतीसाठी निर्धारण केले जात आहे अशा अधिका-यांची गुणवत्ता 'पात्र' किंवा 'अपात्र' याप्रमाणे निश्चित करावी. विभागीय पदोन्नती समितीद्वारे ज्यांना पात्र म्हणून श्रेणीबध्द केले जाईल फक्त अशांचाच, पूरक श्रेणीतील परस्परांतर्गत सेवाज्येष्ठतेच्या अनुक्रमाने क्रमबध्द करुन निवडसूचीमध्ये समावेश करावा. ज्या अधिका-यांना विभागीय पदोन्नती समितीद्वारे 'अपात्र' म्हणून श्रेणीबध्द केलेले असेल त्यांचा निवडसूचीमध्ये समावेश करण्यात येऊ नये.

(ब) विदेशी सेवेत किंवा अध्ययन रजेवर असणा-या कर्मचा-यांची प्रकरणे सुध्दा विभागीय पदोन्नती समितीद्वारे विचारात घेतली जातील.

(क) शासकीय कर्मचा-यांच्या बाबतीत केंद्र सरकारकडून वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या सूचना, विभागीय पदोन्नती समितीच्या कामकाजामध्ये अवलंबिण्याच्या पध्दतीवर योग्य त्या फेरफारांसह लागू असतील.

<u>टीप:</u> ज्याकरिता संयुक्त सेवाप्रवेश पध्दतीचा अवलंब केलेला आहे अशा रु.**१६०००–४००–२०८००** व त्यापेक्षा अधिक वेतनश्रेणी असलेल्या पदांच्या समायोजनासाठी, संपूर्ण श्रेणीदानातील स्थिरचिन्ह हे 'अत्युत्कृष्ट' असे असले पाहिजे. इतर सर्व प्रकरणात, स्थिरचिन्ह हे 'उत्कृष्ट' असे असावे.

(३) निवडेतर पदांवरील पदोन्नतीसाठी, जेथे स्थिरचिन्ह विनिर्दिष्ट केलेले नसेल तेथे निवडीचा निकष हा सेवाज्येष्ठतेसह पात्रता असा असावा.

## २८. <u>तदर्थ नेमणूका</u>

तातडीची गरज असेल त्या प्रकरणात, जेव्हा विभागीय पदोन्नती समितीद्वारे शिफारस केलेली नामिका ही उपयोगात आणली गेली असेल तेव्हा नियुक्ती प्राधिका-यांनी, पूरक श्रेणीतील किंवा पदावरील सर्वात ज्येष्ठ; पात्र आणि योग्य कर्मचा-यांची, एका वेळेस सहा महिन्यांच्या आणि एक वर्षाहून जास्त नसलेल्या कालावधीसाठी किंवा विभागीय

पदोन्नती समितीद्वारे नवीन नामिकेची शिफारस होईपर्यंत, यापैकी जे आधी असेल तोपर्यंत, निव्वळ तदर्थ स्वरुपात नियुक्ती करावी. सेवाप्रवेश नियमांमध्ये दिलेली पात्रता, अनुभव पूर्ण करण्याच्या काटेकोरपणे अधीन राहून जेथे अपरिहार्य असेल तेथे तदर्थ नियुक्ती करावी.

## २९. <u>अनुकंपा तत्वावरील नियुक्त्या</u>

या विनियमांमध्ये काहीही नमूद असले तरी अध्यक्ष, या विनियमात विहित केलेल्या सेवाप्रवेशाच्या सर्वसाधारण प्रक्रिया अनावश्यक करुन वर्ग तीन किंवा वर्ग चार च्या पदावर, सेवेत कार्यरत असताना मृत्यू पावलेल्या मंडळातील कर्मचा-याच्या औरस मुलास किंवा मुलीस किंवा उत्तरजीवी पत्नी किंवा पतीस, जर अशा प्रकारे नियुक्त करावयाची व्यक्ती विहित पात्रता व अनुभव धारण करणारी आणि याबाबतीत केंद्र सरकारने वेळोवेळी जारी केलेले आदेश/मार्गदर्शक तत्त्वे यांच्या अधीन राहून, अन्यथा इतर प्रकारे योग्य असल्यास, नियुक्ती देईल.

## ३०. <u>अर्थनिर्वचन</u>

या विनियमांच्या उपयोजनार्थ, या विनियमाच्या कोणत्याही तरतुदींशी विसंगत नसलेल्या, वेळोवेळी सुधारित केल्याप्रमाणे असणा-या केंद्र सरकारच्या सर्व सूचना आणि विवक्षितपणे स्पष्ट न केलेल्या बाबींना स्पर्श करणा-या, केंद्र सरकारद्वारे वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या सर्व सूचनांचे पालन केले जाईल.

***1.*** जेथे या विनियमांच्या अर्थ उकल करण्यासंबंधात कोणतीही शंका उद्भवल्यास, प्रकरण अध्यक्षांकडे निर्णयार्थ पाठविण्यात येईल व त्यावरील त्यांचा निर्णय हा अंतिम व बंधनकारक असेल.

## ३१. <u>निरसन व व्यावृत्ती</u>

मुंबई पोर्ट ट्रस्ट कर्मचारी (सेवाप्रवेश, सेवाज्येष्ठता व पदोन्नती) विनियम, **१९७७**, आणि मुंबई पोर्ट ट्रस्ट (विभागप्रमुखांचा सेवाप्रवेश) विनियम, **१९९२**, या सर्व विनियमांशी आणि या विनियमांच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी अमंलात असलेल्या विनियमांशी संबंधित प्रक्रिया, प्रथा व रुढी यांचे याद्वारे निरसन करण्यात येते.

परंतु अशाप्रकारे निरसित केलेल्या विनियम, प्रक्रिया, प्रथा व रुढी या अन्वये दिलेला कोणताही आदेश किंवा केलेली कृती ही या विनियमांच्या संबंधित तरतुदींअन्वये दिलेला आदेश किंवा केलेली कृती असल्याचे मानले जाईल.

---

***1.*** T.R. No. 13 dated 25.4.2014 and G.S.R. 149(E) dated 8.2.2016 प्रमाणे जोडले गेले.

END PAGES

(भारताचे राजपत्र, असाधारण याच्या भाग-दोन, विभाग 3, उपविभाग (एक) मध्ये प्रकाशित करावयाचे)

नौवहन मंत्रालय
(बंदरे शाखा)

नवी दिल्ली, दिनांक

शुध्दिपत्र

जीएसआर------ (इ) भारताचे राजपत्र, असाधारण, भाग दोन, विभाग 3, उपविभाग (एक) दि.7 मे, 2010 मध्ये प्रकाशित केलेली नौवहन मंत्रालयाच्या क्र. जीएसआर 387 (इ) दि. 7 मे, 2010 मधिल भारत सरकारच्या अधिसूचनेतील अनुसूचि एक मधील मुंबई पोर्ट ट्रस्ट कर्मचारी (सेवाप्रवेश, सेवाज्येष्ठता व पदोन्नती) विनियम, 2010 यात

(1) अनुक्रमांक 25 च्या स्तंभ 8 मधील '(तीन) एखाद्या मान्यताप्राप्त विद्यापीठाची कायद्यातील पदवी' या मजकुरापूर्वी 'प्रधान्यशिल' हा मजकूर समाविष्ट करण्यात यावा.

(2) अनुक्रमांक 64 च्या स्तंभ 8 मधील, आवश्यक (एक) या मजकुराखाली 'विद्यापीठाची' या मजकुरापुर्वी 'मान्यताप्राप्त' हा मजकूर समाविष्ट करण्यात यावा. अशा त-हेने ही ओळ 'विद्यापीठाची पदवी' या ऐवजी 'मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी ' अशी वाचण्यात यावी.

(3) अनुक्रमांक 108 च्या स्तंभ 12 मध्ये 'उप सचिव/संचालक' या मजकुराऐवजी 'सह सचिव' हा मजकूर बदलीदाखल करण्यात यावेत.

(राकेश श्रीवास्तव)
भारत सरकारचे सहसचिव

प्रति,
व्यवस्थापक,
छारत सरकार मुद्रणालय,
मायापुरी, नवी दिल्ली.